# नारायण मेघाजी लोखंडे एक उत्तम जनसंज्ञापक

**प्रमोद श्रीरंग फरांदे** , संशोधक विद्यार्थी, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रस्तावना: एखादा विचार अथवा मूल्य समाजामध्ये रूजविण्यासाठी संज्ञापनाची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे संज्ञापनाची प्रक्रिया, महत्त्व आणि त्याचा वापर करण्याचे कौशल्य आत्मसात करणे उपयुक्त ठरते. आपल्याकडील ज्ञान, कल्पना, माहिती व भावना इ. आदान प्रदान करणे व त्याद्वारे इच्छित परिणाम साधण्याच्या क्रियेला संज्ञापन म्हणतात. लोकांना ज्ञान देऊन त्यांचे वर्तन, विचार, दृष्टिकोन बदलण्याचे संज्ञापन एक साधन आहे, असे स्पष्ट होते. यामध्येज्ञानाच्या पातळीवर सामाईक होणे हे अपेक्षित आहे. या संज्ञापन शास्त्राचा अभ्यास करून शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत.

विल्बर श्रॅम यांच्या मते, 'प्रगत आणि अप्रगत सामाजिक घटकांमध्ये माहितीचे आदान-प्रदानातून संघटन घडवून आणणे व सामाईकत्व निर्माण करणे यातूनच संज्ञापनाची प्रक्रिया जन्म घेते'.[१] ॲलन ल्युईस म्हणतात, 'दुसऱ्या व्यक्तीच्या मनामध्ये अपेक्षित गोष्टींचे आकलन घडून आणण्यासाठी एखाद्या व्यक्तीने केलेल्या सर्व गोष्टींचा समावेश संज्ञापन प्रक्रियेत होतो. यामध्ये पद्धतशीर, आणि सातत्यपूर्ण सांगणे, ऐकणे व समजून घेणे या गोष्टींचा समावेश होतो.'[२]

संज्ञापनामुळे समाजामध्ये प्रबोधनाद्वारे समतेवर आधारलेला समाज निर्माण करणे शक्य आहे. हे महात्मा फुलेंनी ओळखले होते. त्यामुळे संज्ञापनाचा वापर करतच १८४८ पासून महात्मा फुलेंनी सामाजिक कार्यास सुरवात केली होती. संज्ञापन शास्त्राचा अभ्यास शास्त्रज्ञांनी २० व्या शतकापासून सुरू केला. महात्मा फुलेंनी मात्र त्यापूर्वी म्हणजे १८४८ पासून संज्ञापनाद्वारे सामाजिक बदल घडविण्यास प्रारंभ केला होता. यावरून ते एक उत्तम संज्ञापन तज्ञ होते हे सिद्ध होते. महात्मा फुलेंनी ग्रंथ लेखन, वर्तमानपत्रामध्ये लेखन, पोवाडा, अखंड, काव्य पत्रव्यवहार, असे संज्ञापनाचे वेगवेगळे माध्यम हाताळलेले दिसतात. यामागे समग्र सामाजिक परिवर्तन हे ध्येय होते. ही संज्ञापन माध्यमे वापरत असताना अशिक्षित लोकांचे संज्ञापन करण्यास वेगळ्या माध्यमाची आवश्यकता महात्मा फुलेंनी जाणली होती. अशिक्षित लोकांसाठी स्वत: लिहिलेल्या पुस्तकांचे जाहीरपणे वाचन, भाषण, चर्चा, वादविवाद, या माध्यमाचा खुबीने वापर केला. श्रोता वर्गाचे अचूक भान ठेवत संज्ञापनाचा वापर केला गेला. लोकांच्या जगण्या मरण्यातले प्रसंग संवादात्मकरीत्या मांडल्याने संज्ञापनाचा लोकांवर परिणामकारक प्रभाव पडत होता. अंधश्रद्धा, कर्मकांड, धर्माच्या नावाखाली धर्म ग्रंथात घुसडलेल्या लबाड्या बाहेर काढण्यासाठी संज्ञापनाचा वापर केला गेला. लोकशिक्षण करणारे 'सत्यशोधक जलसे' या प्रभावी जनसंज्ञापान माध्यमाचा शोध सत्यशोधकांनी लावला. सत्यशोधक जलसे या जनसंज्ञापन माध्यमाद्वारे सत्यशोधक कार्यकर्ते गावोगावी फिरून विविध सामाजिक विषयांवर पोवाडे, पदे, साध्या आणि सोप्या गीतातून प्रबोधनाचा विचार लोकांच्या मनावर कोरला जाई. मनोरंजनातून दिलेला संदेश जनसमूहाच्या जास्त लक्षात राही. भाषण, चर्चा, वादविवाद, सत्यशोधक जलसे या जनसंज्ञापन माध्यमाचा वापर सत्यशोधक चळवळीने मोठ्या प्रमाणावर केला. या संज्ञापनमाध्यमाद्वारे सत्यशोधक विचारांचा प्रसार खेड्यापाड्यात पोहचवला.

महात्मा फुले यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनीही सामाजिक बदलासाठी संज्ञापनाचा खुबीने वापर कला. जनसंज्ञापनासाठी नव्याने उपलब्ध झालेले माध्यम म्हणून 'दीनबंधु' हे पत्र त्यांनी मुंबईतून सुरू केले.

नारायण लोखंडेंनी वृत्तपत्र या जनसंज्ञापन माध्यमाद्वारे सत्याच्या शोध घेत लोकशिक्षण केले. त्यांनी वापरलेले जनसंज्ञापानाचे माध्यम हे तत्कालीन समाजाच्या मनोवृत्तीमध्ये बदल करण्यासाठी अत्यंत प्रभावी असे ठरले. संज्ञापकाला कोणत्या लोकसमूहास कसे आणि काय सांगावे याचे भान असेल तरच ते संज्ञापन यशस्वी ठरते. नारायण लोखंडे यांना त्यांचे भान होते हे सुरू केलेल्या 'दीनबंधु'च्या प्रभावावरून दिसून येते. संज्ञापनाच्या इच्छित परिणाम साध्य करण्यासाठी लोकसमूहाच्या भाषेचाच वापर केला होता.

जनसंज्ञापनामध्ये वृत्तपत्राचे महत्त्वाची कार्ये म्हणजे माहिती पुरवणे, शिक्षण, मनोरंजन, जाहिराती आणि जनमत तयार करणे आहे. नारायण लोखंडे यांनी चालविलेल्या 'दीनबंधु' ने ही सर्व कार्ये उत्तमपणे पार पाडली. तत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधने मर्यादित असतानाही देशविदेशातील वैविध्यपूर्ण माहिती समाजापुढे ठेवली.

'दीनबंधु'ने तत्कालीन सामाजिक प्रश्नांवर जनमत तयार करण्यासाठी लेखन केले. विशेषत: शिक्षण, कामगार, आरोग्य मागास समाजाची उन्नती अशा विविध प्रश्नांना स्थान दिले. त्यामुळे ब्रिटिश सरकारलाही या प्रश्नांची दखल घेणे भाग पडले. सामाजिक अशांततेच्या काळात नारायण मेघाजी लोखंडे त्यांची भूमिका सामाजिक सलोख्याच्या बाजूने जनमत तयार करण्यासाठी प्रेरक ठरली. त्याचप्रमाणे सत्यशोधक विचारांच्या प्रसार आणि प्रसारालाही नारायण लोखंडेंच्या जनसंज्ञापनाचे मोठे साह्य झाले.

**नारायण मेघाजी लोखंडे यांच्या जनसंज्ञापानेची (पत्रकारितेची )वैशिष्ट्ये** ः पत्रकारिता हे संज्ञापनाचेच एक अंग आहे. एका संवेदनशील संज्ञापकाची सर्ववैशिष्ट्ये लोखंडेयांच्या पत्रकारितेत निदर्शनास येतात. ती खालील प्रमाणे. .

**नारायण लोखंडे यांची भाषाशैली** ः नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'दीनबंधु' हे पत्र ज्या लोकांसाठी सुरू केले होते त्या वर्गाला समजेल व त्यांच्यामध्ये परिवर्तन घडेल अशा उद्देशाने त्यांच्या व्यवहारातील बोलीभाषेचा वापर केला. शब्दांचे पांडित्य, जडशील भाषा आणि या प्रदर्शनातून स्वश्रेष्ठत्त्वाचे गुणगान ह्या तत्कालीन ब्राम्हणी वृत्तपत्रांच्या शैलीला 'दीनबंधु'ने फाटा दिला आणि समाजातल्या शेवटच्या स्तरातील व्यक्तीलाही हे पत्र आपले वाटावे, अशी प्रवाही भाषा लोखंडेंनी 'दीनबंधु'मध्ये वापरली. म्हणूनच बहुजन समाजाला हे वृत्तपत्र आपलेसे वाटे व या वृत्तपत्राचा प्रभाव बहुजन समाजावर पडल्याचे दिसून येते. लोखंडे यांच्या वृत्तपत्रीय भाषेविषयी मनोहर कदम म्हणतात, 'तत्कालीन ब्राम्हणी पत्रांच्या प्रमाण भाषेपलीकडे जाऊन बहुजनांच्या रूढ बोलीभाषेचा उपयोग लोखंडे 'दीनबंधु'मधून करीत आणि त्यामुळेच अज्ञानी बहुजन समाजास आपलेच दु:ख कुणीतरी मांडत असल्याचे वाटत असे.'[३]तर सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक रा.ना.चव्हाण यांनी 'लोखंडे यांचे मराठी साधे व सोपे होते.'[४] असा उल्लेख स्वातंत्र्यपूर्व काळातील कामगार चळवळ या लेखामध्ये केला आहे.

**आशय गर्भ व समर्पक शीर्षके** ः नारायण मेघाजी लोखंडेंनी 'दीनबंधु'तून तत्कालीन समाजाशी संवाद साधताना विचारपूर्वक शीर्षके दिली. 'मागास लोकांचा उर्जित काळ केव्हा येणार,'[५] आम्हास दारूचे व्यसन कोणी लावले',[६] 'मुसलमान व हिंदू लोकांत पूर्ववत सलोखा व्हावा,'[७]'प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता'[८] ही शीर्षक त्याचीच द्योतक आहेत.

**सुस्पष्टध्येयवाद ः**'दीनबंधु'ची स्थापना सत्यशोधक विचारधारेला अनुलक्षून झाल्याने, समाज सुधारणेंचे ध्येय या वृत्तपत्राच्या पानांपानावर स्पष्ट झालेले आढळते. तथापि ध्येयाप्रती मोघम वाटचाल न करता समाजाच्या मुलभूत प्रश्नांना हात घालून नारायण मेघाजी लोखंडेंनी 'दीनबंधु'च्या ध्येय धोरणांना दिशा दिली.

**श्रमप्रतिष्ठेचा जागर ः** कामगार आणि शेतकरी या समाजासाठी आपले श्रम खर्च करणाऱ्या घटकांकडे अक्षम्य तुच्छतेने पाहणाऱ्या तत्कालीन समाजाला लोखंडेंनी आपल्या लेखनीतून या प्रश्नांवर चर्चा करण्यास भाग पाडले. नडलेल्या आणि दास्यत्वाचा न्यूनगंड बाळगणाऱ्या या दोन्ही समाज घटकांच्या श्रमाला, 'दीनबंधु'ने प्रतिष्ठा मिळवून दिली. केवळ अनुकंपेच्या दृष्टिकोनातून न पाहता, शेतकरी आणि कामगार वर्गाला त्यांच्या न्याय हक्कांसाठी आवाज दिला.

**लोकशाहीची बीजे पेरणारी पत्रकारिता ः** स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलभूत मूल्ये आहेत. या मूल्यांच्या प्रसारासाठीच लोखंडेंनी पत्रकारिता केली. प्रत्येक समाज घटकाला शिक्षण, विकास आणि उन्नतीचा अवसर मिळाला पाहिजे, ही 'दीनबंधु'ची भूमिका होती. वर्चस्ववादाला फाटा देऊन, समाजातील सर्वांचीच प्रगती केली, तरच समाज पुढे जाईल या भूमिकेतून लोखंडेंनी लोकजागराचे काम केले. मानवी मूल्यांना प्रतिष्ठा दिली, तरच लोकशाही हा सहजीवन साधणारा जीवनमार्ग ठरतो अन्यथा ती हुकूमशाही होते. 'दीनबंधु'तून लोखंडेंनी असमानतेचा धिक्कार करून समान कायद्यांवर व आधारित नीतिमान समाज रचनेचे स्वप्न पाहिले असे त्यांच्या लेखांमधून अभिव्यक्त होते.

**सर्वसमावेशक व धर्मनिरपेक्ष भूमिका ः** वृत्तपत्रांनी समाजातील जबाबदार घटकांची भूमिका पार पाडावी, असे अपेक्षित असते. विशेषत: समाज जेव्हा अनेक जाती धर्मांचे बनलेला असतो तेव्हा ही जबाबदारी आणखीच वाढते. या अनुषंगाने लोखंडेंच्या पत्रकारितेत धर्मनिरपेक्षतेची बीजे आढळतात. हिंदू-मुस्लिम दंगलीसमयी 'दीनबंधु'तन त्यांनी केलेले लेखन हे सामाजिक सलोखा व ऐक्यासाठी आवाहन करणारे होते. अशा प्रसंगी शह-काटशहाचे राजकारण आणि धर्म श्रेष्ठत्वाच्या भूमिकेतून चिथावणीखोर लेखन करण्यापेक्षा संयमी आणि शांतता प्रस्थापित करणारे त्यांचे विचार आणि सक्रिय सहभाग यामुळे दोन धर्मात निर्माण झालेल्या तेढीची लागण इतरत्र झाली नाही, असे म्हणण्यास वाव आहे.

**उपयोजित पत्रकारिता ः** सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह करताना केवळ तात्त्विक मीमांसा करून आणि त्या प्रश्नांचे कारण शोधून प्रश्न सुटत नाहीत. सामाजिक परिवर्तनाचे ध्येय साध्य करताना सामाजिक प्रश्नांवर तर्कशुद्ध उपाय सुचविणे हे पत्रकाराचे आद्य कर्तव्य ठरते. लोखंडेंनी 'दीनबंधु'तून शिक्षण, कामगार, कायदे, जातिभेद, शेतकरी यांचे प्रश्न हाताळताना, तत्कालीन बहुजन समाजातील लोकांनी सहज अनुसरण्यासारखे उपाय सुचविले.

**प्रेरणादायी पत्रकारिता ः** प्रेरणा जी व्यक्तीला कृतिशील बनवते तशीच समाज मनालाही परिवर्तनाला उद्युक्त करते. समाजातील शोषण, हुकूमशाही दास्यत्व आणि प्रस्थापितांकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात वृत्तपत्राने घेतलेल्या भूमिकेमुळे नवसमाज निर्मितीच्या विचार प्रक्रियेला प्रोत्साहन मिळते. त्यापुढे जाऊन वृत्तपत्राचा विवेकवादी दृष्टिकोन समाजाला जागृत करण्याच्या प्रयत्नाला नवे परिमाण देतो.

या कसोटीवर 'दीनबंधु'तून नारायण मेघाजी लोखंडे यांनी केलेली पत्रकारिता खरी उतरते. नारायण मेघाजी लोखंडेंनी बहुजनांमधील उच्च शिक्षितांचा, समान कार्यकर्त्यांचा यथोच्छित गौरव 'दीनबंधु'तून केला. त्यातून बहुजन समाजातील नवशिक्षितांना आत्मविश्वास दिला. मुंबईतील शोषित गिरणी कामगारांनी गिरणीमाल, व्यवस्थापक यांच्याविरोधात उठविलेला आवाज, शेतकऱ्यांनी जाचक सरकारी व्यवस्थेविरोधात उठविलेला आवाज यामागे नारायण लोखंडेंच्या पत्रकारितेची प्रेरणा होती. समाज परिवर्तनासाठी सक्रियतेचा ध्यास घेतलेल्या 'दीनबंधु'ने धर्म आणि परंपरेच्या जोखड झुगारून देशाचे सीमोल्लंघन करणाऱ्या महाराज सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू छत्रपतींच्या भूमिकेंचा सन्मान केला. त्यांच्या परदेश प्रवासांचा राज्याच्या सामाजिक, भौतिक आणि आर्थिक विकासास फायदाच होईल, अशी भूमिका लोखंडेंनी घेतली.

**निष्पक्ष व सडेतोड भूमिका ः** निष्पक्ष पत्रकारिताच समाजाला परिवर्तनाच्या मार्गावर घेऊन जाऊ शकते कारण अशा पत्रकारितेतच सुधारणांचे नैतिक सामर्थ्य असते. विशेषत: सामाजिक चळवळीला दिशा देताना, निष्पक्ष भूमिका, ह्या समाजाची परिवर्तनाप्रति विश्वासार्हता वाढविणाऱ्या असतात. लोखंडेंच्या पत्रकारितेचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. बहुजन समाजोद्धाराच्या कामात ज्या ज्या वेळी त्यांचे विरोधक कधी बहुजन हिताचे काम करताना दिसले तर त्यांचा गौरव लोखंडेंनी केला आहे. त्यांना 'दीनबंधु'तून यथोचित प्रसिद्धीही दिली. विशेषत: शिक्षण क्षेत्रात समाजाभिमुख काम करणाऱ्या लोकांचा 'दीनबंधु'ने सन्मान केला. सामाजिक पुनर्गठणासाठी काम करीत असताना वृत्तपत्राने विवेकनिष्ठ व वस्तुनिष्ठ भूमिका घेणेच आवश्यक असते. 'दीनबंधु'च्या समकालीन वृत्तपत्रांनी सामाजिक सुधारणांच्या विषयांवर घेतलेल्या विरोधी भूमिकांचा लोखंडेंनी परखडपणाने समाचार घेतलेला दिसतो. त्यात कोणाचाही मुलाहिजा न ठेवता आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहून 'दीनबंधु'ने प्रसंगी तत्कालीन समाजसुधारकांवरही शब्दप्रहार केले.

**पत्रकारितेची आचारसंहिता :**

नारायण लोखंडे यांनी पत्रकारिता कशी असावी याची आचारसंहिता सांगितली आहे.

१. 'वर्तमानपत्रांचे खरे कर्तव्य म्हटले म्हणजे सार्वजनिक हित कशात आहे याकडे लक्ष पुरवून त्यांच्या पिच्छा पुरविला पाहिजे.'[९]

२. 'अल्पशा लाभाकरिता लोकांत भेदाभेद वाढविणे हे चांगले नाही.'[१०]

३. 'देशी वर्तमानपत्राची बढती होण्यास मुख्य सत्याचा पाया बळकट पाहिजे. डोळ्यासमोरच्या घडलेल्या गोष्टीस खोटेच स्वरूप देऊन मनमानेल तसे लिहिणे ह्यात आम्ही आमच्या हातांनीच आमची किंमत कमी करून घेतो.'[११]

४. 'लिहता आले म्हणून मनास वाट्टेल ते बरळणे ह्यात पुरषार्थ नाही.'[१२]

५. 'कोणत्याही विषयावर लिहताना किंवा दुसऱ्यावर टीका करताना फार सावधगिरी ठेवली पाहिजे.'[१३]

६. 'जो बाणा धरावा तो शेवटास नेण्याची वारंवार काळजी बाळगीत जावी. बाण्याविरूद्ध चालणारास चोक कवडीमोड समजतात.'[१४]

७. 'वर्तमानपत्रासारखे देशोन्नतीस खंबीर साधन दुसरे कोणतेच नाही.'[१५]

८. 'वर्तमानपत्रातील लेखकांनी आपले लेख भारणसुद्धा होण्यास नेहमी फार जपले पाहिजे. लिहावयास मजकूर नाही म्हणून पाहिजे त्यावर पोरकट टीका करण्याचे भरीस पडू नये.'[१६]

९. 'पत्रापासून सरकार व लोक यावर जे वजन किंवा वजक बसली पाहिजे तशी न बसल्याने ही पत्रे जन्मून न जन्मून सारखीच.'[१७]

१०. 'वर्तमानपत्रांनी आपल्या कर्तव्याप्रमाणे लोकसेवा करण्यास आळस करू नये.'[१८]

११. 'विनाकारण व मत्सराने लेख लिहिण्याने लोक नाखुप होतात व शिक्षाही भोगावी लागते.'[१९]

वृत्तपत्राबरोबर नारायण लोखंडे यांनी मौखिक संज्ञापन माध्यमांचाही मोठ्या कुशीलतेने वापर केला. निरक्षर लोकांसाठी त्यांनी भाषण, चर्चा, परिसवांद वादविवाद या माध्यमांचा वापर केला. या माध्यमांचाही अशिक्षित लोकांवर मोठा परिणाम घडून आला. लोखंडेंनी 'दीनबंधु'च्या माध्यमातून ज्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली, त्यांचेकडून लोखंडेंना भरघोस पाठिंबा मिळाला. कामगार, शेतकरी यांनी लोखंडेंच्या कार्यात उत्स्फुर्तपणे सहभागी झाले. तत्कालीन अशिक्षित, अर्धशिक्षित असलेला हा समाज घटक लोखंडेंच्या कार्यात सहभागी झाला. हे लोखंडेंच्या जनसंवादाच्या हातोटीचे यश आहे असेच म्हणावे लागेल. थोडक्यात नारायण लोखंडे हे महात्मा फुलेंच्या प्रमाणे जाणकार संज्ञापक होते.संज्ञापनाचे कार्य हे मुख्यत्वेकरून प्रत्येक व्यक्तीला केवळ शिक्षित, ज्ञानी, सुजाण बनवित नाहीतर ते प्रत्येकाला परिपूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न करीत असते. संज्ञापनाचे ज्ञान त्यांच्याकडे होते. त्यामुळे त्यांचे संज्ञापन हे परिणामकारक ठरले.यावरून नारायण लोखंडे हेउत्तम संज्ञापक होते हे स्पष्ट होते.

**संदर्भ ः**


१. फोंडे योगेश : विकास प्रकल्पांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमाती व आर्थिक दुर्बल घटकातील टसर रेशीम उत्पादकांनी अवलंबिलेल्या तंत्रज्ञानाचा अभ्यास, पीएच.डी. प्रबंध, २०१३, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

२. तत्रैव.

३. कदम मनोहर : 'भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे', म.फुले समता प्रतिष्ठान, अक्षर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, डिसेंबर २००२, पृ.१०९

४. चव्हाण रा.ना.चव्हाण रा.ना.: महात्मा फुले सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, अक्षर श्रद्धांजली, पुणे, १० एप्रिल २००२, पृ.५०

५. दीनबंधु १२ फेब्रुवारी, १८९६.

६. दीनबंधु १४ जून १८९६.

७. दीनबंधु८ ऑक्टोबर १८९३.

८. दीनबंधु९ एप्रिल १८९३.

९. दीनबंधु२१ एप्रिल , १८९५.

१०. कित्ता.

११ कित्ता.

१२. कित्ता.

१३. कित्ता.

१४. कित्ता.

१५. दीनबंधु१४ एप्रिल , १८९५.

१६. दीनबंधु२१ एप्रिल , १८९५

१७. दीनबंधु२ जुन , १८९५

१८. दीनबंधु६ एप्रिल , १८९६

१९. कित्ता